## नियमीत दिवाणी दावा क्र.१९३/२०२४ मधील निशाणी क्र.१३ वरील आदेश

( CNR : MHAH250005542024 )

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होऊन प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जाचे पुष्ठ्यर्थ प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी क्र.१४ वर प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

२. सदर प्रतिवादींचे असे कथन आहे की, सदर दाव्यामध्ये ते हजर झाले असुन त्यांनी कैफीयत दाखल करणे आवश्यक होते. परंतु सदर प्रतिवादी हे वयोवृध्द असुन त्यांना कैफियत देण्याकामी लागणारी महत्वाची कागदपत्रे मुदतीत उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे सदर प्रतिवादींना आपले म्हणणे मांडता आले नाही. सदर प्रतिवादी प्रस्तुत अर्जासोबत कैफियत देत आहेत. परंतु त्यांचेविरोधात झालेला विनाकैफियत आदेश रद्द होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसे न झाल्यास सदर प्रतिवादींना नैसर्गिक न्यायापासून वंचित रहावे लागणार आहे. सबब, सदर प्रतिवादींनी त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होऊन प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफियत दाखल करण्यास परवानगी मागितली आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, सदर प्रतिवादी हे दि.५.७.२०२४ रोजी हजर झाले होते परंतु मुदतीत कैफीयत दाखल केली नाही म्हणुन त्यांचेविरुध्द विना कैफीयत आदेश झाला आहे. त्यानंतर वादींनी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त खर्चाचा आदेश व्हावा.

४. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. वादींनी सदरचा दावा प्रतिवादींच्या विरोधात जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ ते ४ विरुध्द दि.१९.८.२०२४ रोजी विनाकैफियत आदेश झालेला आहे व प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी आज दि.९.१२.२०२४ रोजी दाखल केलेला आहे. दाव्यातील कथनाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, सदर दाव्यामध्ये पक्षकारांचे शेतजमीनींमधील मौल्यवान अधिकार समाविष्ट आहेत. सदर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जासोबत

कैफियत दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादींची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अतोनात नुकसान होईल. तसेच प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. प्रतिवादीने मुदतीत कैफियत न दिल्यामुळे वादीस झालेल्या त्रासाबद्दल वादींना रक्कम रु.४००/- इतका खर्च वादीस देणे न्यायोचित होईल. सबब, अर्जातील कथनांचा विचार करता नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेविरोधात दि.१९.८.२०२४ रोजी झालेला विनाकैफियत आदेश त्यांनी रु.४००/- वादींना देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येत आहे.

SHITAL CHANDRAKIRAN SALVI

Digitally signed by SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Date: 2024.12.10 11:59:54 +0530

( एस. सी. साळवी )

**दि.०९.१२.२०२४**
**पारनेर**

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**पारनेर**